**नियमीत दिवाणी दावा क्र. ८०/२०२३ मधील निशाणी क्र. ४८ कडील अर्जावर आदेश.**

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ तर्फे त्यांच्याविरुध्द निशाणी क्र. ५ कडील अर्जावर दिनांक ०७/११/२०२४ रोजी पारीत करण्यात आलेला युक्तिवाद नाही असा आदेश रद्द करुन निशाणी क्र.५ कडील अर्जावर युक्तिवाद करण्यास संधी देण्याकरीता दाखल केला आहे.

२) प्रस्तुत अर्जास वादीतर्फे दिलेल्या निशाणी क्र. ५० कडील म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ४ हे दाव्याचे कामकाज जाणीवपुर्वक लांबणीवर टाकत आले आहेत. प्रतिवादी क्र. ४ ला पुरेसी संधी दिली आहे व त्यामुळे अर्ज खर्चासह नामंजुर करावा.

३) प्रस्तुत अर्जाकामी दोन्ही पक्षांतील विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) दोन्ही पक्षातील विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला असता व रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, निशाणी क्र. ५ कडील अर्जाच्या युक्तीवादाकामी प्रतिवादी क्र. ४ ला व त्यांच्या विद्वान वकीलांना पुकारले असता गैरहजर असल्याने प्रतिवादी क्र. ४ तर्फे निशाणी क्र. ५ कडील अर्जावर युक्तीवाद नाही असा आदेश दिनांक ०७/११/२०२४ रोजी पारीत केला आहे. माझ्या मते प्रतिवादी क्र. ४ च्या विरुध्द निशाणी क्र. ५ वर पारीत केलेला युक्तीवाद नाही हा आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र. ४ च्या वकीलांना निशाणी क्र. ५ कडील अर्जावर युक्तीवाद करण्याची संधी देऊन निशाणी क्र. ५ कडील अर्ज गुणवत्तेच्या आधारे निकाली

काढणे न्यायाचे व उचित आहे. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो व त्यानुसार निशाणी क्र. ५ कडील अर्जावर दिनांक ०७/११/२०२४ रोजी प्रतिवादी क्र. ४ विरुध्द पारीत केलेला युक्तिवाद नाही हा आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र. ४ च्या विद्वान वकीलांना निशाणी क्र. ५ कडील अर्जावर युक्तिवाद करण्यास परवानगी देण्यात येते.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2025.01.15 16:43:37 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांक– १५/०१/२०२५ २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.